मुंबई

■ सोमवार, ७ सप्टेंबर ते १३ सप्टेंबर २०२६
■ वर्ष : १४
■ अंक : २५
■ पृष्ठ : ४
■ किंमत : २ रुपए
■ PRGI Regd. No: MAHMAR/2013/50698

मराठी साप्ताहिक

# सातारा प्रतिनिधी

संपादक : एकनाथ दगडू गाडे    कार्यकारी संपादक : निखिल गाडे



जाहिरात करा,
योग्य वाचकांपर्यंत पोहोचा

आपल्या व्यवसायाची, सेवा, उत्पादन, संस्था, कार्यक्रम किंवा सार्वजनिक उपक्रमाची माहिती प्रभावीपणे पोहोचवा.

व्यवसाय | संस्था | कार्यक्रम | उत्पादने आणि सेवा | सार्वजनिक उपक्रम

आपल्या जाहिरातीसाठी संपर्क साधा.
संपर्क : +91 98213 49985


# दहीहंडीला 'नशामुक्त महाराष्ट्रा'ची जोड; फडणवीसांचे गोविंदांना आवाहन

मुंबई प्रतिनिधी

**मुंबई:** ढोल-ताशांचा गजर, गोविंदा रे गोपाळाचा जयघोष आणि उंचच उंच मानवी मनोऱ्यांच्या थरारात मुंबईत दहीहंडी उत्साहात साजरी झाली. यंदाच्या दहीहंडी उत्सवाला 'नशामुक्त महाराष्ट्र' या संकल्पनेची जोड देण्यात आली. युवकांनी व्यसनांपासून दूर राहून निरोगी व सक्षम समाजनिर्मितीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.
मुख्यमंत्री फडणवीस यांनी वरळी, दादर आणि घाटकोपर येथील विविध दहीहंडी उत्सवांना भेट देत गोविंदा पथकांना शुभेच्छा दिल्या. वरळीतील राजयोग प्रतिष्ठानच्या




दहीहंडी उत्सवात त्यांच्या हस्ते प्रतीकात्मक दहीहंडी फोडून उत्सवाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी 'नशामुक्त महाराष्ट्र'चा संदेश देणारे बॅनरही प्रदर्शित करण्यात आले.
दहीहंडी हा केवळ मनोरंजनाचा उत्सव नसून महाराष्ट्राची परंपरा, तरुणाईचे साहस, संघभावना आणि शिस्तीचा उत्सव आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. मानवी मनोरा उभारताना प्रत्येक गोविंदाची भूमिका महत्त्वाची असते. परस्परांवरील विश्वास, समन्वय आणि धैर्याच्या जोरावर हे आव्हान पेलले जाते, असेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, उंच मानवी मनोरे रचताना गोविंदा पथकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी आणि उत्सवाचा आनंद घेताना गोविंदांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.
घाटकोपर येथील दहीहंडी उत्सवात आमदार राम कदम, तर वरळीतील जांबोरी मैदानावरील उत्सवात परिवर्तन फौंडेशनचे पदाधिकारी सहभागी झाले होते. यावेळी महापौर रितू तावडे, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार कालिदास कोळंबकर, प्रवीण दरेकर, राम कदम, अमित साटम यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी, आयोजक आणि गोविंदा पथके उपस्थित होती.

## थोडक्यात

### चिमुकल्यांच्या पाठीवरील ओझे कमी होणार; शाळांना सरकारचे कडक निर्देश

मुंबई प्रतिनिधी

मुंबई : विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी राज्यातील सर्व शाळांमध्ये केंद्र शासनाच्या 'स्कूल बॅग पॉलिसी-२०२०'ची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दिले आहेत. विद्यार्थ्यांच्या दप्तराचे वजन त्यांच्या शारीरिक वजनाच्या साधारणतः १० टक्क्यांपेक्षा अधिक असू नये, असे शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांनी परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.
जड दप्तरामुळे विद्यार्थ्यांच्या पाठीचा कणा, खांदे आणि शारीरिक वाढीवर होणारे विपरीत परिणाम टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. पूर्वप्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना शक्यतो दप्तर आणण्याची गरज भासू नये, यासाठी शाळांनी नियोजन करावे. तसेच दररोज आवश्यक असलेलीच पुस्तके व वह्या आणण्यासाठी वर्गनिहाय 'दप्तर वेळापत्रक' तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
विद्यार्थ्यांना सर्व पुस्तके दररोज घरी न्यावी लागू नयेत, यासाठी शाळांमध्ये कपाटे,




शेल्फ किंवा लॉकरची व्यवस्था करावी. जड पाण्याची बाटली आणण्याची गरज पडू नये म्हणून शाळांमध्ये स्वच्छ व पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे.
इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्षातून 10 दिवसांचा दप्तरविरहित कालावधी आयोजित करण्याचेही निर्देश आहेत. या काळात सुतारकाम, बागकाम, हस्तकला, कृषी तसेच स्थानिक व्यवसायांची ओळख करून देणारे अनुभवाधारित उपक्रम राबविण्यात येणार आहेत.
शाळांनी विद्यार्थ्यांच्या व दप्तराच्या वजनाची नियमित तपासणी करून नोंद ठेवावी. नियमांचे पालन होत आहे की नाही, याची तपासणी शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी आणि विस्तार अधिकारी यांनी अचानक भेटी देऊन करावी. अनुपालन अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

### EPFO: नोकरीत पूर्ण झाली 17 वर्षे, मग ही सुवर्णसंधी सोडू नका, PF नव्हे तर अनेक योजनांचा लाभ मिळणार

नवी दिल्ली

**नवी दिल्ली:** कर्मचारी भविष्य निधी संघटनेने (ईपीएफओ) सामाजिक सुरक्षा लाभांपासून वंचित राहिलेल्या पात्र कर्मचाऱ्यांना ईपीएफओच्या कक्षेत आणण्यासाठी कर्मचारी नोंदणी मोहीम (ईईसी) सुरु केली आहे. हे विशेष अभियान ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत सुरु राहणार आहे.
या मोहिमेअंतर्गत १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत ईपीएफ कव्हरेजसाठी पात्र असलेल्या; मात्र काही कारणांमुळे नोंदणी न झालेल्या कर्मचाऱ्यांना नोंदणीची संधी मिळणार आहे. यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना पीएफसोबत पेन्शन आणि विमा योजनांचाही लाभ मिळू शकणार आहे.
या मोहिमेतील महत्त्वाची बाब म्हणजे, संबंधित कर्मचाऱ्याचा हिस्सा यापूर्वी नियोक्त्याने वसूल केला नसेल, तर १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीतील कर्मचाऱ्याचा हिस्सा माफ केला जाणार आहे. नोंदणीसाठी उमंग ॲपद्वारे ऑनलाइन घोषणा करणे आवश्यक असून, फेस ऑथेंटिकेशनच्या माध्यमातून यूएएनची नोंदणी करता येणार आहे.
दरम्यान, ऑनलाइन ईपीएफ दाव्यांचा निपटारा साधारण सात ते दहा दिवसांत होतो. यासाठी केवायसी पूर्ण असणे आवश्यक आहे. २० दिवसांत दावा निकाली न निघाल्यास सदस्यांना ईपीएफआयजीएमएस पोर्टलवर तक्रार करता येईल.




## महापुरुषांच्या रांगेत पंतप्रधानांचा फोटो नको; अमित ठाकरेंच्या भूमिकेवर राज ठाकरेंची ठाम भूमिका

ठाणे प्रतिनिधी

**ठाणे:** छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांसारख्या महापुरुषांच्या प्रतिमांच्या रांगेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो असता कामा नये; मात्र सरकारी कार्यालयात पंतप्रधानांचा फोटो स्वतंत्र ठिकाणी असायलाच हवा, अशी स्पष्ट भूमिका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी ठाण्यात मांडली. पुण्यातील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातील फोटो प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरेंनी अमित ठाकरे यांच्या भूमिकेचे समर्थन केल्याने मनसे-भाजप वादाला नवे वळण मिळण्याची शक्यता आहे.
मनसेच्या राज्यभरातील पदाधिकाऱ्यांचा मेळावा रविवारी ठाण्यात झाला. यावेळी मार्गदर्शन करताना राज ठाकरे यांनी पुण्यातील घटनेवर भाष्य केले. सरकारी कार्यालयात पंतप्रधानांचा फोटो असणे आवश्यक आहे; मात्र तो महापुरुषांच्या प्रतिमांच्या रांगेत न लावता स्वतंत्र भिंतीवर असावा, असे त्यांनी स्पष्ट केले.
पुण्यातील गणेशखिंड येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात पाहणीसाठी गेलेल्या अमित ठाकरे यांच्या निदर्शनास महापुरुषांच्या प्रतिमेजवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रतिमा लावण्यात आल्याचे आले होते. त्यावर त्यांनी आक्षेप घेतल्यानंतर मनसे कार्यकर्त्यांनी मोदींची प्रतिमा हटविल्याचा आरोप आहे. या प्रकरणी अमित ठाकरे यांच्यासह मनसे कार्यकर्त्यांविरोधात चतु:श्रृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून काही कार्यकर्त्यांना अटकही करण्यात आली होती.
या घटनेनंतर मनसे आणि भाजपमध्ये राजकीय वाद निर्माण झाला. मुंबईतील माटुंगा परिसरात दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद झाला, तर कल्याण-डोंबिवलीतील मनसेसोबतची युती तोडण्याची मागणी भाजपच्या स्थानिक नेत्यांकडून करण्यात आली.



या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी अमित ठाकरे यांच्या भूमिकेचे समर्थन करताना, "छत्रपती शिवाजी महाराज, बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांच्या रांगेत कोणी बसू शकत नाही," असे स्पष्ट केले. "सरकारी कार्यालयात पंतप्रधानांचा फोटो असायला पाहिजे. कारण ते पंतप्रधान आहेत. बाकी मतभेद शंभर असतील; पण तो दुसऱ्या भिंतीवर... त्या रांगेत नको," असेही त्यांनी सांगितले.
दरम्यान, राज ठाकरे यांनी सध्याच्या सामाजिक वातावरणावरही भाष्य केले. "धर्माचा अभिमान समजू शकतो; पण धर्माची झिंग नको. धर्माभिमानी असले पाहिजे, धर्मांध नव्हे," असा संदेश त्यांनी मनसे कार्यकर्त्यांना दिला. सोशल मीडियाच्या माध्यमातून समाजात राग आणि तणाव निर्माण करून लोकांचे लक्ष महत्त्वाच्या प्रश्नांपासून विचलित करण्याचा प्रयत्न होत असल्याचा दावा त्यांनी केला.
पुण्यातील फोटो प्रकरणावरून मनसे आणि भाजपमध्ये आधीच निर्माण झालेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरेंनी घेतलेल्या या भूमिकेमुळे आगामी काळात या वादाला राजकीय धार येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## मोराची शिकार करून मांस शिजविणारा ताब्यात

सातारा प्रतिनिधी

**सातारा:** मोराची शिकार करून त्याचे मांस शिजविल्याप्रकरणी सातारा वन विभागाने वर्ये, ता. सातारा येथील सागर गौतम पवार याला ताब्यात घेतले आहे. वन विभागाच्या पथकाने कारवाई करून घटनास्थळावरून मोराची पिसे, शिजविलेले मांस, मोराचे दोन पाय, शिकार करण्यासाठी वापरलेला सापळा, सुरे, सत्तूर, विळीचा लाकडी पाट, ताटली, मांस चिरण्यासाठी वापरलेली परात तसेच होंडा शाईन मोटारसायकल असा मुद्देमाल जप्त केला.
वन विभागाला मिळालेल्या माहितीनंतर पथकाने वर्ये येथे तातडीने धाव घेत घटनास्थळी पाहणी केली. प्राथमिक तपासात सापळ्याच्या साहाय्याने मोराची शिकार करण्यात आल्याचे समोर आले. त्यानंतर मोराचे मांस काढून ते शिजविण्यात आल्याचेही घटनास्थळी आढळून आले. पंचांच्या उपस्थितीत घटनास्थळाचा पंचनामा करून संबंधित मुद्देमाल जप्त करण्यात आला.
कारवाईदरम्यान दोन पातेल्यांमध्ये शिजविलेले मांस, मोराची पिसे आणि मोराचे दोन पाय आढळून आले. याशिवाय मोर पकडण्यासाठी वापरलेला सापळा, तीन छोटे सुरे, एक मोठा सत्तूर, विळीचा लाकडी पाट, छोटी ताटली आणि मांस चिरण्यासाठी वापरलेली परात जप्त करण्यात आली. वनगुन्ह्यात वापरल्याचा संशय असलेली शाईन मोटारसायकलही वन विभागाने ताब्यात घेतली आहे.
मोर हा वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत संरक्षित वन्यप्राणी असून त्याची शिकार करणे कायद्याने प्रतिबंधित आहे. त्यामुळे सागर पवार याच्याविरुद्ध वन्यजीव संरक्षण कायद्यातील तरतुदींनुसार कारवाई सुरू करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेले वन्यजीव अवशेष आणि मांस यांची आवश्यकतेनुसार वैद्यकीय व वैज्ञानिक तपासणी करण्यात येत आहे.
ही कारवाई उपवनसंरक्षक अमोल सातपुते व सहाय्यक वनसंरक्षक प्रदीप रौंदळ यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र सातारा येथील अधिकारी व कर्मचारी तसेच वनपरिक्षेत्र फिरते पथक, सातारा यांच्या संयुक्त पथकाने केली. या प्रकरणाचा पुढील तपास वन विभागाकडून सुरू आहे.




## "पोटात दुखतंय..." साडेतीन वर्षांच्या चिमुकलीने सांगितलं अन् पालकांच्या पायाखालची जमीन सरकली!

नवी मुंबई, प्रतिनिधी

**नवी मुंबई:** कामोठे परिसरात साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर स्कूल बसमध्ये चालकाने लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. घरी पोहोचल्यानंतर 'माझ्या पोटात खूप दुखत आहे,' असे सांगत चिमुकली रडू लागली.
त्यानंतर तिने आपल्यासोबत झालेल्या प्रकाराची माहिती कुटुंबीयांना दिली. हा प्रकार समोर आल्यानंतर कुटुंबीयांनी कामोठे पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी या प्रकरणी स्कूल बसचालक इस्को यादव (वय ३०) याच्याविरुद्ध पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित चिमुकली कामोठे सेक्टर ३६ येथील एका शाळेत शिकते. शाळा सुटल्यानंतर दुपारी तीनच्या सुमारास ती स्कूल बसने घरी जात होती. याच दरम्यान बसचालक इस्को यादव याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. घरी गेल्यानंतर चिमुकलीने त्रास होत असल्याचे सांगितल्यानंतर कुटुंबीयांना संशय आला. त्यांनी विचारपूस केली असता चिमुकलीने घडलेला प्रकार सांगितला.
कुटुंबीयांनी तत्काळ कामोठे पोलिसांशी संपर्क साधल्यानंतर पोलिसांनी प्रकरणाची गंभीर दखल घेत आरोपीला ताब्यात घेतले. इस्को यादव हा कळंबोली सेक्टर ३ येथील माऊली मंदिर परिसरात राहत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्याच्याविरुद्ध पोक्सो कायद्यानुसार कारवाई करण्यात आली असून, प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक गणेश इंगळे करीत आहेत.
या घटनेमुळे पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. स्कूल बसचालक तसेच अटेंडंटची नियुक्ती करण्यापूर्वी त्यांची योग्य पार्श्वभूमी तपासली जाते का, तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातात का, असा सवाल पालकांकडून उपस्थित केला जात आहे. चिमुकलीच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## विद्यार्थिनी सृष्टीच्या मृत्यूची उच्चस्तरीय चौकशी; 'रयत'कडून तीन सदस्यीय समिती

सातारा प्रतिनिधी

**सातारा:** येथील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समधील विद्यार्थिनी सृष्टी भानुदास बिरामणे हिच्या दुर्दैवी मृत्यूप्रकरणी रयत शिक्षण संस्थेने तीन सदस्यीय उच्चस्तरीय चौकशी समिती नियुक्त केली आहे. या प्रकरणाचा पोलिस तपास सुरू असून, सत्य परिस्थिती समोर आणण्यासाठी संस्था पोलिसांना पूर्ण सहकार्य करीत असल्याची माहिती रयत शिक्षण संस्थेचे कुलगुरू डॉ. डी. के. मस्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.
घटनेनंतर संबंधित वसतिगृह रेक्टरला रजेवर पाठविण्यात आले असून, वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात येत आहे. वसतिगृहाची इमारत निर्धारित निकषांनुसार बांधण्यात आली असल्याचे डॉ. मस्के यांनी सांगितले. मात्र, भविष्यात अशा घटना घडू नयेत, यासाठी अधिकची दक्षता म्हणून वसतिगृहाच्या इमारतीतील आवश्यक ठिकाणी संरक्षक जाळी बसविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.
महाविद्यालय तसेच वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचाही सविस्तर आढावा घेतला जात आहे. उच्चस्तरीय चौकशी समितीच्या तपासणीत कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा अथवा कसूर आढळून आल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे डॉ. मस्के यांनी स्पष्ट केले. सृष्टीच्या कुटुंबाला न्याय मिळावा, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्यास संस्थेचे प्राधान्य राहणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.



दरम्यान, या घटनेनंतर विविध सामाजिक संस्था, संघटना, विद्यार्थी प्रतिनिधी तसेच नागरिकांकडून संबंधित पदाधिकाऱ्यांच्या राजीनाम्याची आणि सृष्टीच्या कुटुंबाला भरपाई देण्याची मागणी केली जात आहे. भरपाईबाबत समितीच्या चौकशीतील निष्कर्ष, समोर येणारी तथ्ये आणि संस्थेच्या नियमांचा विचार करून योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे डॉ. मस्के यांनी सांगितले.

# संपादकीय

## डीजे... पेक्षा पुणेकरांचा आवाज...?

पुणे ही केवळ विद्येची, संस्कृतीची आणि विचारांची नगरी नाही; तर अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याची परंपरा असलेले शहर आहे. महात्मा फुले, लोकमान्य टिळक, आगरकर यांच्यापासून सामाजिक प्रश्नांवर निर्भीडपणे भूमिका घेणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांपर्यंत पुण्याने महाराष्ट्राला विचारांची दिशा दिली. मात्र, याच पुण्यात नागरिकांच्या प्रश्नांवर आवाज उठविणाऱ्यांनाच कोणत्या ना कोणत्या प्रकारे गप्प करण्याचे प्रकार घडत असतील, तर हा केवळ एका व्यक्तीचा प्रश्न राहत नाही; तो लोकशाहीच्या आरोग्याचा प्रश्न बनतो. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील घडामोडींनी याच प्रश्नाला ऐरणीवर आणले आहे. नागरिकांच्या प्रश्नांवर आवाज उठविणाऱ्यांवर कारवाई होत असेल, तर त्यामागचे नेमके कारण काय, कोणत्या कायद्याखाली कारवाई झाली आणि तिची प्रक्रिया काय होती, याची पारदर्शक उत्तरे प्रशासनाने पुणेकरांना दिली पाहिजेत.

अटक झाली म्हणजे संबंधित व्यक्ती दोषी ठरते, असा लोकशाहीत कुठलाही नियम नाही. त्याचप्रमाणे पोलिसांनी कारवाई केली म्हणजे पोलिसच चुकीचे आहेत, असेही म्हणता येणार नाही. कायद्याचे राज्य सर्वांसाठी समान असले पाहिजे. मात्र, कायद्याची अंमलबजावणी करताना तिच्या पद्धतीबद्दल प्रश्न उपस्थित होत असतील, तर त्यांची उत्तरे देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. कायदा हातात घेणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे; पण कायद्याचा वापर करून प्रश्न विचारणाऱ्यांचा आवाज दाबला जात नाही ना, याचीही खबरदारी घेतली पाहिजे.

डीजेचा मुद्दा पुण्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. उत्सव, मिरवणुका आणि धार्मिक कार्यक्रमांमध्ये ध्वनीची मर्यादा, रात्रीची वेळ, नागरिकांचे आरोग्य आणि कायदा-सुव्यवस्था यांचा समतोल साधणे आवश्यक आहे. उत्सवाचा आनंद घेण्याचा अधिकार जितका महत्त्वाचा आहे, तितकाच शांततेने जगण्याचा अधिकारही महत्त्वाचा आहे. एखादा नागरिक ध्वनिप्रदूषणाविरुद्ध प्रश्न विचारतो म्हणून त्याच्यावर हल्ला होणे ही गंभीर बाब आहे. मतभेद असतील तर त्याला उत्तर विचाराने द्यायचे की हात उगारून?

पुणेकरांना आपल्या शहरातील प्रश्नांबद्दल चिंता आहे आणि त्या प्रश्नांची उत्तरे हवी आहेत. नागरिकांना चांगले रस्ते, सुरक्षित वाहतूक, ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण, समान कायदा आणि तक्रारींची दखल घेणारे प्रशासन हवे आहे. या मूलभूत अपेक्षा मांडण्यासाठी नागरिकांना वारंवार रस्त्यावर उतरावे लागत असेल, तर प्रशासनाने आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे.

गणेशोत्सव हा पुण्याच्या सांस्कृतिक अस्मितेचा अविभाज्य भाग आहे. या उत्सवाचा उत्साह कमी करण्याचा प्रश्न नाही. उलट, उत्सवाची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी शिस्त, संयम आणि कायद्याचे पालन आवश्यक आहे. ढोल-ताशांचा नाद असो, मिरवणुका असोत किंवा डीजेचा आवाज असो, उत्सवाच्या नावाखाली नागरिकांच्या शांततेचा आणि आरोग्याचा बळी जाऊ नये. त्याचवेळी प्रशासनाने नियमांची अंमलबजावणी करताना निवडकपणा दाखवू नये. नियम सर्वांसाठी समान असतील, तर त्यांच्यावरील विश्वास वाढेल.

पोलिस हे लोकशाही व्यवस्थेतील महत्त्वाचे अंग आहेत. एखाद्या कार्यकर्त्यावर कारवाई झाली असेल तर तिच्यामागे कोणताही अनुचित दबाव नसल्याचा विश्वास निर्माण करण्यासाठी प्रशासनाने आवश्यक ती माहिती सार्वजनिक केली पाहिजे. आरोप-प्रत्यारोपांपेक्षा पारदर्शकता महत्त्वाची आहे. अन्यथा अफवांना खतपाणी मिळते आणि समाजमाध्यमांवरील संताप अधिक तीव्र होतो.

आज पुणे सरकारकडे उत्तर मागत आहे. नागरिकांच्या प्रश्नांवर आवाज उठविणाऱ्यांचे संरक्षण कोण करणार? ध्वनिप्रदूषणाविरुद्ध बोलणाऱ्या नागरिकाला सुरक्षित वातावरण कोण देणार? रस्त्यांवरील खड्ड्यांविषयी तक्रार करणाऱ्याची दखल कोण घेणार? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, कायद्याचा धाक सामान्य नागरिकासाठी आहे की सत्तेच्या सोयीप्रमाणे त्याचा वापर केला जाणार आहे?

पुणेकरांचा आवाज ऐकला पाहिजे. तो दाबण्याचा प्रयत्न झाला तर प्रश्न संपणार नाहीत; उलट ते अधिक मोठे होतील. लोकशाहीमध्ये सरकारची ताकद नागरिकांना गप्प करण्यात नसते, तर नागरिकांच्या आवाजाला उत्तर देण्यात असते.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात निर्माण झालेला हा तणाव सरकारने गांभीर्याने घेतला पाहिजे. नागरिकांच्या तक्रारींची दखल, संबंधित घटनांची निष्पक्ष चौकशी आणि कारवाईमागील कायदेशीर कारणांची स्पष्टता यामुळेच प्रशासनावरील विश्वास कायम राहू शकतो. पुणेकरांना असा विश्वास मिळाला पाहिजे की त्यांनी प्रश्न विचारले म्हणून त्यांच्यावर कारवाई होणार नाही; तर त्यांच्या प्रश्नांना उत्तर दिले जाईल. कारण पुण्याचा आवाज हा केवळ एका व्यक्तीचा आवाज नाही. तो नागरिकांचा आवाज आहे. तो ऐकला नाही, तर उद्या तो आणखी मोठा होईल.

## फुटपाथ मोकळे करण्यासाठी पालिकेचा हातोडा; भायखळा-मुंबई सेंट्रलमध्ये ३० स्टॉल्स हटविले

मुंबई प्रतिनिधी

**मुंबई:** 'पादचारी प्रथम' अभियानांतर्गत मुंबई महापालिकेने भायखळा आणि मुंबई सेंट्रल परिसरात धडक कारवाई करत तब्बल ३० अनधिकृत स्टॉल्सवर हातोडा मारला. तसेच मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकाजवळ पूर्वेकडून नायर रुग्णालयाकडे जाणाऱ्या मार्गावरील पदपथावर जागेपेक्षा अधिक जागा व्यापून व्यवसाय करणाऱ्या २७ स्टॉलधारकांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. या कारवाईमुळे परिसरातील पदपथ पादचाऱ्यांसाठी मोकळे करण्यात आले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्या मार्गदर्शनाखाली बृहन्मुंबईतील पदपथ अतिक्रमणमुक्त करण्यासाठी 'पादचारी प्रथम' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत शुक्रवारी भायखळा परिसरात मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली. उपआयुक्त (परिमंडळ-१) चंदा जाधव आणि सहायक आयुक्त आनंद कंकाळ यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या कारवाईत भायखळा परिसरातील १५ अनधिकृत स्टॉल्स हटविण्यात आले.



डॉ. आनंद राव नायर मार्गावरील नायर रुग्णालयाजवळ सुमारे २६० मीटर लांबीच्या पदपथाची सुधारणा व दुरुस्ती करण्यात आली आहे. या पदपथाची सरासरी रुंदी ३.७५ मीटर असून, त्यातील सुमारे २.१५ मीटर रुंदीचा भाग पादचाऱ्यांच्या सलग आणि मोकळ्या वाहतुकीसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या मार्गावरील पदपथावर अडथळा ठरणारे १३ अनधिकृत स्टॉल्स हटविण्यात आले. नायर रुग्णालय परिसर असल्याने या मार्गाचा वापर रुग्ण, त्यांचे नातेवाईक, रुग्णालयातील कर्मचारी आणि नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात केला जातो.

भायखळा पूर्व रेल्वे स्थानकापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्य रेल्वे रुग्णालय आणि वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालयाकडे जाणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील सुमारे ४३५ मीटर लांबीच्या पदपथांचीही सुधारणा करण्यात आली आहे. या पदपथाची सरासरी रुंदी ३.२५ मीटर असून, त्यापैकी सुमारे १.५० मीटर रुंदीचा भाग पादचाऱ्यांसाठी मोकळा करण्यात आला आहे. या ठिकाणी असलेले दोन अनधिकृत स्टॉल्स निष्कासित करण्यात आले.

दरम्यान, मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकाजवळ पूर्वेकडून नायर रुग्णालयाकडे जाणाऱ्या मार्गावरील पदपथावर २७ स्टॉलधारकांनी मंजूर जागेपेक्षा अधिक जागा व्यापल्याचे आढळून आले. संबंधित सर्व २७ स्टॉलधारकांना पालिकेने नोटिसा बजावल्या आहेत. पदपथावरील अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांना होणारा त्रास कमी करण्यासाठी पुढील काळातही अशाच प्रकारची कारवाई सुरू राहणार असल्याचे पालिकेकडून स्पष्ट करण्यात आले. या परिसरातील पदपथांवरील २१ झाडांभोवतीच्या मातीच्या आळ्यांचीही दुरुस्ती करण्यात आली. काही झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यात आली असून, पदपथांची दुरुस्ती, अतिक्रमण हटविणे आणि झाडांच्या परिसराची देखभाल यामुळे नागरिकांना अधिक सुरक्षित व सलग पादचारी मार्ग उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

## 'माझ्या चिमण्यांनो, मला माफ करा...' मुलींची माफी मागत ASI अधिकाऱ्याने जीवन संपवलं; सुसाईड नोटमध्ये पोलिसांची नावं?


नवी मुंबई, प्रतिनिधी

**नवी मुंबई:** 'माझ्या चिमण्यांनो, मला माफ करा...' असा भावनिक संदेश देत नवी मुंबई पोलीस दलातील सहायक पोलीस उपनिरीक्षक (ASI) पी. एन. पाटील यांनी ऐरोली परिसरातील एका लॉजमध्ये गळफास घेऊन जीवन संपवल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे नवी मुंबई पोलीस दलात खळबळ उडाली आहे. मृत्यूपूर्वीचा त्यांचा कथित व्हिडिओ आणि घटनास्थळी आढळलेली कथित सुसाईड नोट सध्या तपासाचा महत्त्वाचा भाग ठरली आहे.

पी. एन. पाटील यांनी जीवन संपविण्यापूर्वी आपल्या वडिलांची तसेच मुलींची माफी मागितल्याची माहिती समोर आली आहे. ऐरोली परिसरातील लॉजमध्ये त्यांनी फॅनला गळफास घेतला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, घटनास्थळी कथित सुसाईड नोट आढळल्याची प्राथमिक माहिती असून, त्यामध्ये काही पोलीस अधिकाऱ्यांच्या नावांचा उल्लेख असल्याचे सांगितले जात आहे. तत्कालीन डीसीपी संजय कुमार पाटील, वायरलेस विभागाचे एसीपी गिरीश ठाकरे आणि आस्थापना विभागातील हेड कॉन्स्टेबल जयवंत आहीरे यांच्या नावांचा त्यात समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, या कथित नोटमध्ये नेमके कोणते आरोप करण्यात आले आहेत, याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही.

मृत्यूपूर्वी पी. एन. पाटील यांनी मोबाईलमध्येही काही व्यक्तींची नावे घेतल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यामुळे त्यांच्या मृत्यूमागील नेमके कारण काय, तसेच त्यांना कोणी मानसिक त्रास दिला होता का, याचा तपास पोलीस करीत आहेत. कथित सुसाईड नोट, व्हिडिओ आणि इतर उपलब्ध माहितीच्या आधारे तपासाची दिशा निश्चित केली जाणार आहे. अधिकृत तपास पूर्ण झाल्यानंतरच या प्रकरणातील आरोपांबाबत स्पष्टता होणार आहे.




## 'मला जो कॅन्सर झाला, तो तुरुंगातून सुरू झाला'; संजय राऊतांचा दावा

कोल्हापूर प्रतिनिधी

**कोल्हापूर:** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते तथा खासदार संजय राऊत यांनी आपल्या कर्करोगाच्या आजाराचा संबंध आर्थर रोड कारागृहातील वास्तव्याशी जोडत खळबळजनक दावा केला आहे. तुरुंगातील अस्वच्छ वातावरण, अपुऱ्या सुविधा आणि तेथील परिस्थितीमुळे आपल्याला झालेल्या कर्करोगाचे मूळ तिथेच असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे. कोल्हापुरात झालेल्या एका जाहीर कार्यक्रमातील मुलाखतीदरम्यान त्यांनी हा दावा केला.

तुरुंगातील परिस्थितीचा अनुभव सांगताना राऊत म्हणाले, अनेक चांगल्या घरातील आणि चांगले जीवन जगलेले लोक तुरुंगात गेल्यानंतर एका छोट्याशा खोलीत राहतात. एका खोलीत दहा-दहा लोकांना ठेवले जाते. तेथे टॉयलेटची योग्य व्यवस्था नसते. आंघोळीचीही नीट सोय नसते. तुरुंगातून आपली कधी सुटका होईल, हेही सांगता येत नाही. तुरुंगात व्यवस्थित जेवणही मिळत नाही. मला जो कॅन्सर झाला, तो तिथूनच सुरू झाला. मी आजारी असल्याचे सांगितल्यानंतर माझे कॅन्सरचे निदान झाले. मात्र, या आजाराचे मूळ तुरुंगात असल्याचे राऊत यांनी सांगितले.

गोरेगाव येथील पत्राचाळ पुनर्विकास प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) केलेल्या कारवाईनंतर राऊत यांना १ ऑगस्ट २०२२ रोजी अटक करण्यात आली होती. त्यानंतर त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आणि आर्थर रोड कारागृहात त्यांनी १०१ दिवस घालवले. ९ नोव्हेंबर २०२२ रोजी विशेष पीएमएलए न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला. त्यांच्या अटकेच्या प्रक्रियेवर न्यायालयाने गंभीर निरीक्षणे नोंदवत अटक बेकायदेशीर असल्याचे म्हटले होते.

पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पात सुमारे १ हजार ३४ कोटी रुपयांचा कथित गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने (म्हाडा) गुरु आशिष कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडला ६७२ भाडेकरूंच्या पुनर्वसनासाठी प्रकल्प दिला होता. संबंधित कंपनीने पुनर्वसनाची घरे बांधण्याऐवजी प्रकल्पातील फ्लोअर स्पेस इंडेक्स (एफएसआय) खासगी विकासकांना विकून आर्थिक फायदा केल्याचा आरोप ईडीकडून करण्यात आला होता.




या प्रकरणातील आरोपी प्रवीण राऊत हे संजय राऊत यांचे निकटवर्तीय असल्याचा दावा ईडीने केला होता. प्रवीण राऊत यांना एचडीआयएलकडून सुमारे १०० ते ११२ कोटी रुपये मिळाल्याचा आरोप असून, त्यातील तीन कोटी रुपयांहून अधिक रक्कम संजय राऊत आणि त्यांच्या पत्नी वर्षा राऊत यांच्या खात्यात जमा झाल्याचा दावा तपास यंत्रणेने केला होता. प्रकल्पाच्या सुरुवातीपासून संजय राऊत यांनी या प्रकरणात भूमिका बजावली आणि प्रवीण राऊत यांचा कथित 'फ्रंटमन' म्हणून वापर केला, असेही ईडीकडून सांगण्यात आले होते. दरम्यान, संजय राऊत यांनी त्यांच्यावरील सर्व आरोप फेटाळून लावले होते. हे प्रकरण राजकीय हेतूने करण्यात आले असून, केंद्रातील तपास यंत्रणांचा गैरवापर केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला होता. तुरुंगातून बाहेर आल्यानंतर त्यांनी आपल्या कारागृहातील अनुभवांवर आधारित 'नरकातला स्वर्ग' हे पुस्तकही लिहिले.

दरम्यान, २०२५ मध्ये दिवाळीच्या काही दिवस आधी संजय राऊत यांना पोटाच्या कर्करोगाचे निदान झाल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर त्यांनी काही काळ विश्रांती घेणार असल्याचे सांगत केमोथेरपी आणि रेडिएशनचे उपचार सुरू केले होते. तुरुंगात गेल्यापासूनच पोटासंबंधी त्रास जाणवत होता; मात्र, त्याकडे आपण दुर्लक्ष केले, असेही राऊत यांनी त्यावेळी सांगितले होते. आता कोल्हापुरातील जाहीर कार्यक्रमात त्यांनी पुन्हा या आजाराचा आणि आर्थर रोड कारागृहातील वास्तव्याचा संबंध जोडल्याने त्यांच्या वक्तव्याची राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

## शेअर बाजारातील तोट्याने तरुणाचा चोरीचा डाव; घरमालक जागा होताच हातोड्याने हत्या

सोलापूर प्रतिनिधी

माढा : शेअर बाजारात १५ ते २० लाख रुपयांचे नुकसान झाल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या तरुणाने चोरीचा मार्ग स्वीकारला. चोरी करताना घरमालक जागे झाल्याने त्यांच्यावर हातोड्याने वार करून खून केल्याची घटना जामगाव (ता. माढा) येथे घडली. स्थानिक गुन्हे शाखेने आरोपीला कर्नाटकातील वाडी रेल्वे स्थानकावरून अटक केली.

अजयकुमार गौतम चव्हाण (वय ३१, रा. जामगाव, सध्या लऊळ) असे आरोपीचे नाव आहे. २५ ऑगस्टच्या रात्री त्याने घरात प्रवेश करून अशोक भीमान्ना मुळे (वय ६१) यांच्या डोक्यात हातोड्याने वार केला. त्यात मुळे यांचा मृत्यू झाला. त्यानंतर लोखंडी कपाट उचकटून सुमारे २ लाख ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने घेऊन आरोपी फरार झाला.

तपासादरम्यान चव्हाणवर संशय बळावला. पोलिसांचा संशय आल्याने त्याने मोबाईल बंद करून पलायन केले. सीसीटीव्हीच्या आधारे तो कर्नाटकातील कलबुर्गी परिसरात असल्याचे स्पष्ट झाले. वाडी रेल्वे स्थानकावरून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. चौकशीत, संबंधित कुटुंबीय तिरुपतीला गेल्याचे त्याने व्हॉट्सॲप स्टेटसवरून पाहिले होते. घरात कोणी नसल्याचा अंदाज घेऊन त्याने चोरीचा बेत आखल्याचे समोर आले. मात्र, चोरी करताना मुळे जागे झाल्याने आरोपीने त्यांच्यावर हल्ला केला. न्यायालयाने आरोपीला पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली असून पुढील तपास माढा पोलिस करीत आहेत.




## पाकिस्तानच्या २८ धावांत १० विकेट्स! भारतासमोर शेजाऱ्यांनी गुडघे टेकले, T20 तील लाजीरवाणी कामगिरी

क्रीडा प्रतिनिधी

**मुंबई:** आशिया कप २०२६ मधील भारत-पाकिस्तान महिला ट्वेंटी-२० सामन्यात भारतीय गोलंदाजांनी पाकिस्तानच्या फलंदाजीची अक्षरशः वाताहत केली. प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतलेल्या पाकिस्तानचा संघ १८.१ षटकांत अवघ्या ५५ धावांत सर्वबाद झाला. विशेष म्हणजे पाकिस्तानने एका क्षणी बिनबाद २७ धावा केल्या होत्या; मात्र त्यानंतर पुढील २८ धावांत त्यांचे सर्व दहा फलंदाज माघारी परतले. भारताकडून श्री चरणी आणि प्रेमा रावत यांनी प्रत्येकी तीन विकेट घेत पाकिस्तानला मोठी धावसंख्या उभारण्याची संधीच दिली नाही. श्री चरणीने चार षटकांत सात धावा देत तीन बळी घेतले, तर प्रेमा रावतने चार षटकांत नऊ धावा देत तीन विकेट मिळवल्या. दीप्ती शर्मा व अन्य गोलंदाजांनीही प्रभावी मारा केल्याने पाकिस्तानचा डाव झटपट कोसळला. पाकिस्तानकडून मुनीबा अली (१३) आणि शवाल जुल्फिकार (१४) यांच्याशिवाय कोणत्याही फलंदाजाला दुहेरी आकडा गाठता आला नाही. शफाली वर्मानं पाकिस्तानला पहिला धक्का दिल्यानंतर भारतीय गोलंदाजांनी सातत्याने विकेट घेत त्यांच्यावर दबाव कायम ठेवला. दरम्यान, या सामन्यात भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर हिने आंतरराष्ट्रीय ट्वेंटी-२० क्रिकेटमध्ये १५० सामन्यांत नेतृत्व करण्याचा विक्रम नोंदविला. अशी कामगिरी करणारी ती महिला आणि पुरुष क्रिकेटमधील पहिली कर्णधार ठरली.



# डीजे... पेक्षा पुणेकरांचा आवाज...?

पुणे ही केवळ विद्येची आणि संस्कृतीची नगरी नाही; तर सामाजिक चळवळी, वैचारिक संघर्ष, सुधारणावादी विचार आणि लोकशाही मूल्यांची भूमी आहे. अन्याय दिसला की प्रश्न विचारायचा, नागरिकांच्या समस्या मांडायच्या आणि प्रशासनाला जाब विचारायचा, ही पुण्याची परंपरा आहे. त्यामुळेच आज डीजेच्या कर्णकर्कश आवाजाविरोधात पुणेकर रस्त्यावर उतरले, ही केवळ ध्वनिप्रदूषणाविरोधातील मोहीम नाही; तर 'आमच्या जगण्याच्या अधिकाराचा आदर करा', असा प्रशासनाला दिलेला स्पष्ट इशारा आहे.




गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. ढोल-ताशे, लेझीम, पारंपरिक वाद्ये, मिरवणुका आणि सार्वजनिक उत्सव यांना या भूमीत मोठी परंपरा आहे. उत्सव साजरा करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. पण एका व्यक्तीच्या किंवा मंडळाच्या उत्सवाचा आनंद दुसऱ्या नागरिकाच्या आरोग्यावर, झोपेवर, अभ्यासावर किंवा मानसिक शांततेवर आक्रमण करणारा ठरू लागला, तर प्रश्न उपस्थित होणारच. उत्सवाचा अधिकार महत्त्वाचा आहे; पण शांततेने जगण्याचा नागरिकांचा अधिकार त्याहून कमी नाही.

याच पार्श्वभूमीवर पुण्यातील सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांनी डीजे आणि वाढत्या ध्वनिप्रदूषणाविरोधात भूमिका मांडली. माध्यमांशी बोलताना त्यांच्यावर हल्ला झाल्याची घटना समोर आली आणि पुण्यात संतापाची लाट उसळली. एखादा नागरिक एखाद्या सामाजिक प्रश्नावर मत व्यक्त करतो म्हणून त्याच्यावर हात उचलला जात असेल, तर हा प्रश्न केवळ एका व्यक्तीवरील हल्ल्यापुरता मर्यादित राहत नाही. तो थेट अभिव्यक्तिस्वातंत्र्यावरचा हल्ला ठरतो.

याच काळात सामाजिक कार्यकर्ते संतोष पंडित यांच्या अटकेची घटना चर्चेत आली. नागरिकांच्या समस्या, रस्त्यांवरील खड्डे, वाहनांच्या नंबर प्लेटपासून विविध नागरी प्रश्नांवर ते सातत्याने आवाज उठवत असल्याचे त्यांच्या समर्थकांचे म्हणणे आहे. मध्यरात्री झालेल्या



उमेश गायगवळे
9769020286

त्यांच्या अटकेनंतर समाजमाध्यमांवर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. या अटकेमागे नेमके काय कारण होते, कोणत्या कायदेशीर तरतुदींनुसार कारवाई झाली आणि कारवाईची वेळ मध्यरात्रीचीच का निवडण्यात आली, असे अनेक प्रश्न उपस्थित झाले.

येथे एक गोष्ट स्पष्ट असली पाहिजे. पोलीस प्रशासनाला कायदा-सुव्यवस्था राखण्याचा अधिकार आहे; पण त्या अधिकाराला कायद्याची चौकट असते. नागरिकाला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे आणि प्रशासनाला उत्तर देण्याची जबाबदारी आहे. प्रश्न विचारणारा नागरिक गैरसोयीचा वाटू लागला म्हणून त्याचा आवाज दाबण्याचा प्रयत्न झाला, अशी भावना समाजात निर्माण झाली, तर लोकशाहीच्या आरोग्यासाठी ते निश्चितच धोकादायक आहे.

संतोष पंडित यांच्या अटकेमागे कोणताही राजकीय किंवा प्रशासकीय दबाव होता का, हा प्रश्न सध्या समाजमाध्यमांवर उपस्थित केला जात आहे. या आरोपांची सत्यता तपासणे ही संबंधित यंत्रणांची जबाबदारी आहे. मात्र, या प्रश्नाचे उत्तर पारदर्शकपणे देणेही तितकेच आवश्यक आहे. कारण लोकशाहीमध्ये संशयाला जागा निर्माण झाली की प्रशासनावरील विश्वासाला तडा जातो.

आज पुणेकरांनी काढलेला मोर्चा याच अस्वस्थतेचे प्रतीक आहे. 'लाऊडस्पीकर विरोधी पुणेकर मंचा'च्या वतीने बालगंधर्व रंगमंदिर चौकातून पुणे महानगरपालिकेच्या दिशेने निघालेल्या मोर्चात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. 'डीजे नको, शांततामय गणेशोत्सव हवा', 'ध्वनिप्रदूषण बंद करा' अशा घोषणांनी परिसर दुमदुमला. विशेष म्हणजे हा आवाज डीजेच्या आवाजापेक्षा मोठा होता, कारण तो नागरिकांच्या हक्कांचा आवाज होता.

या मोर्चात विद्यानंद बापट स्वतः उपस्थित नव्हते. त्यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पोलिसांनी त्यांच्या निवासस्थानी बंदोबस्त वाढविल्याचे सांगण्यात आले. ते मोर्चात नसले तरी त्यांच्या भूमिकेला पाठिंबा देण्यासाठी नागरिक रस्त्यावर उतरले. याचा अर्थ प्रश्न व्यक्तीपुरता राहिलेला नाही. पुणेकरांना आता आपल्या शहरातील ध्वनिप्रदूषणाच्या प्रश्नावर ठोस निर्णय हवा आहे.

प्रश्न डीजेचा आहे; पण त्यापेक्षा मोठा प्रश्न प्रशासनाच्या इच्छाशक्तीचा आहे.

ध्वनिप्रदूषणासंदर्भात नियम आहेत. आवाजाची मर्यादा निश्चित आहे. कोणत्या वेळेत ध्वनिवर्धक वापरता येतील, याबाबतही नियम आहेत. मग प्रश्न असा, नियम कागदावरच ठेवायचे असतील तर ते करण्याचा उपयोग काय? नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करण्याचे धाडस प्रशासन दाखवणार नसेल, तर कायद्याचा धाक उरणार कसा?

प्रशासनाने कोणत्याही धार्मिक किंवा सांस्कृतिक उत्सवाला विरोध करण्याची गरज नाही. उलट, उत्सव अधिक शिस्तबद्ध, पारंपरिक आणि सर्वसमावेशक कसा होईल, यासाठी पुढाकार घ्यायला हवा. गणेशोत्सवाच्या नावाखाली कर्णकर्कश आवाजाला मोकळे रान देणे आणि दुसरीकडे ध्वनिप्रदूषणाविरोधात बोलणाऱ्या नागरिकांना कायद्याच्या कठोरतेचा सामना करावा लागणे, अशी विसंगती निर्माण झाली तर नागरिकांच्या मनात असंतोष निर्माण होणारच. सरकारने हे लक्षात घेतले पाहिजे की, लोकशाहीत नागरिक हा प्रशासनाचा प्रजा नसतो; तो व्यवस्थेचा भागीदार असतो.

आज डीजेच्या आवाजाविरोधात पुणेकर रस्त्यावर आले आहेत. उद्या हा प्रश्न मुंबईचा असेल, परवा नागपूरचा असेल. वृद्ध, लहान मुले, विद्यार्थी, रुग्ण, रात्रीच्या पाळीत काम करणारे कर्मचारी, परीक्षा देणारे विद्यार्थी, या सर्वांचा विचार करणे ही समाजाची आणि प्रशासनाची सामूहिक जबाबदारी आहे.

सण साजरा करा; पण दुसऱ्याच्या कानावर अत्याचार करू नका. मिरवणूक काढा; पण रुग्णालयाजवळील शांतता भंग करू नका. आनंद साजरा करा; पण कायद्याची मर्यादा ओलांडू नका. आणि सर्वांत महत्त्वाचे, नागरिकांनी प्रश्न विचारले तर त्यांना शत्रू समजू नका.

विद्यानंद बापट यांच्यावर हल्ला झाला असेल तर त्या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. संतोष पंडित यांच्यावर कायदेशीर कारवाई झाली असेल तर तिचे कारण आणि कायदेशीर आधार स्पष्ट झाला पाहिजे. दोन्ही घटनांकडे वेगवेगळ्या चष्म्यातून न पाहता नागरिकांच्या मूलभूत अधिकारांच्या संदर्भात पाहण्याची वेळ आली आहे.

कारण लोकशाही केवळ मतदानाच्या दिवशी जिवंत राहत नाही. ती रोज जिवंत ठेवावी लागते, प्रश्न विचारून, विरोध करून, आंदोलन करून आणि सत्ताधाऱ्यांना जाब विचारून.

आज पुणेकरांनी तोच जाब विचारला आहे.

सरकार आणि प्रशासनाने आता कान बंद करून बसण्याची वेळ नाही. डीजेचा आवाज कमी करण्यासाठीच नव्हे, तर नागरिकांचा आवाज ऐकण्यासाठीही कान उघडे ठेवण्याची वेळ आली आहे.

गणेशोत्सव महाराष्ट्राच्या अस्मितेचा उत्सव आहे. तो कोणाच्याही विरोधाचा विषय होऊ नये. मात्र उत्सवाच्या नावाखाली नागरिकांच्या आरोग्याचा आणि शांततेचा बळीही जाऊ नये. पारंपरिक ढोल-ताशांचा नाद महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अभिमान वाढवतो; कर्णकर्कश डीजेचा दणदणाट मात्र त्याच संस्कृतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करू शकतो.

# गोविंदाच्या उपचाराचा खर्च शासन उचलणार; प्रताप सरनाईकांची मोठी घोषणा

ठाणे प्रतिनिधी

**ठाणे:** दहीहंडी उत्सवात थरावरून कोसळून गंभीर जखमी झालेल्या भिवंडीतील गोविंदा नागेश भोईर यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च उचलण्याची घोषणा मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. तसेच नागेशच्या कुटुंबाला पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. दहीहंडी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर सरनाईक यांनी घेतलेल्या या निर्णयाचे स्वागत होत आहे.

सन 2009 मध्ये अवघ्या 24व्या वर्षी नागेश भोईर दहीहंडीचा थर रचताना जमिनीवर कोसळला होता. या दुर्घटनेत त्याच्या मणक्याला गंभीर दुखापत झाली. उपचारानंतर त्याला कायमचे अपंगत्व आले असून, गेल्या अनेक वर्षांपासून तो अंथरुणावर आहे. स्वतःच्या पायावर उभे राहून सामान्य जीवन जगण्याचे त्याचे स्वप्न या दुर्घटनेमुळे अधुरे राहिले.

दहीहंडी दुर्घटनेनंतर सुरुवातीच्या काळात मित्र आणि इतरांकडून नागेशला मदत मिळाली. मात्र कालांतराने ही मदत कमी होत गेली. उपचारांचा वाढता खर्च पेलणे कुटुंबासाठी कठीण झाले. त्यामुळे काही दिवसांपूर्वी नागेशने सोशल मीडियाच्या माध्यमातून सरकारकडे आर्थिक मदतीऐवजी आपल्या उपचारांचा खर्च शासनाने उचलावा, अशी मागणी केली होती.

नागेशच्या या मागणीची दखल घेत मंत्री प्रताप सरनाईक यांनी त्याच्या उपचाराचा संपूर्ण खर्च करण्याची घोषणा केली. तसेच कुटुंबाला पाच लाख रुपयांची मदत देण्याचेही त्यांनी जाहीर केले. दहीहंडीच्या थरावरून कोसळलेल्या एका गोविंदाच्या आयुष्याला आधार देण्याचा हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.



# फेक लिंक, ओटीपी अन् बनावट अकाउंटच्या जाळ्यापासून सावधान! अंबवडेत विद्यार्थ्यांकडून नागरिकांना सायबर सुरक्षेचे धडे

सातारा प्रतिनिधी

डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर, ऑनलाइन खरेदी, मोबाईल बँकिंग, यूपीआय तसेच सोशल मीडिया यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन अधिक सुलभ झाले असले, तरी त्याचबरोबर ऑनलाइन फसवणुकीच्या घटनांमध्येही वाढ होत आहे. सायबर गुन्हेगारांकडून विविध क्लृप्त्या वापरून नागरिकांची आर्थिक तसेच वैयक्तिक माहिती मिळविण्याचे प्रकार वाढत असल्याने डिजिटल व्यवहार करताना विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे.

याच पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी इंटरनॅशनल फिटनेस स्टुडिओ, अंबवडे येथे विशेष जनजागृती उपक्रम घेण्यात आला. कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज रिसर्च, वर्ये, सातारा येथील विद्यार्थी प्रतिक ठोंबरे आणि साहिल भैसे यांनी क्विक हील फाउंडेशनच्या सहकार्याने हा 'इम्पॅक्ट अॅक्टिव्हिटी' उपक्रम राबविला. या वेळी जिममध्ये उपस्थित नागरिकांशी संवाद साधून सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, त्यापासून बचाव करण्याच्या पद्धती आणि फसवणूक झाल्यानंतर करावयाच्या उपाययोजनांची माहिती देण्यात आली.

**फेक लिंकपासून ओटीपीपर्यंत सावधानतेचा इशारा**

सायबर गुन्हेगारांकडून नागरिकांना आकर्षक संदेश, बँक खाते बंद होण्याची भीती, केवायसी अपडेट करण्याचे आवाहन, विविध ऑफर, बक्षिसे किंवा बनावट सरकारी योजनांच्या नावाखाली लिंक पाठविल्या जातात. अशा लिंकवर क्लिक केल्यानंतर नागरिकांची वैयक्तिक किंवा आर्थिक माहिती चोरीला जाऊ शकते. त्यामुळे अनोळखी व्यक्तींकडून आलेल्या लिंकवर क्लिक करू नये, असा सल्ला विद्यार्थ्यांनी दिला. तसेच ओटीपी, एटीएम पिन, यूपीआय पिन, पासवर्ड किंवा बँक खात्याशी संबंधित गोपनीय माहिती कोणत्याही व्यक्तीसोबत शेअर करू नये, याबाबत विशेष मार्गदर्शन करण्यात आले. बँक किंवा कोणतीही अधिकृत संस्था फोनवरून अशा प्रकारची गोपनीय माहिती मागत नाही, हेही नागरिकांच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

बनावट सोशल मीडिया खात्यांपासूनही सावध राहण्याचे आवाहन

सोशल मीडियावर एखाद्या व्यक्तीच्या नावाने बनावट खाते तयार करून त्याच्या मित्र-नातेवाईकांकडे पैशांची मागणी करणे, संशयास्पद लिंक पाठविणे किंवा वैयक्तिक माहिती मिळविण्याचे प्रकार घडत आहेत. त्यामुळे सोशल मीडिया खात्यांची गोपनीयता सुरक्षित ठेवणे, मजबूत पासवर्ड वापरणे आणि शक्य असल्यास टू-फॅक्टर ऑथेंटिकेशनचा वापर करणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

**फसवणूक झाल्यास घाबरू नका**

सायबर फसवणुकीला बळी पडल्यास घाबरून न जाता तातडीने योग्य ती पावले उचलणे महत्त्वाचे आहे. आर्थिक फसवणूक झाल्यास संबंधित बँकेशी त्वरित संपर्क साधणे, व्यवहाराची माहिती सुरक्षित ठेवणे तसेच अधिकृत सायबर गुन्हे तक्रार यंत्रणेकडे तक्रार नोंदविणे याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

नागरिकांनी सायबर गुन्ह्यांपासून बचाव करण्यासाठी 'सावधगिरी हीच सुरक्षितता' या तत्त्वाचा अवलंब करावा. कोणताही ऑनलाइन व्यवहार करण्यापूर्वी संदेश, लिंक किंवा समोरच्या व्यक्तीची विश्वासार्हता तपासणे आवश्यक असल्याचे विद्यार्थ्यांनी स्पष्ट केले.

प्रश्नोत्तरांतून नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

उपक्रमादरम्यान उपस्थित नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवित सायबर फसवणुकीच्या विविध घटनांबाबत प्रश्न विचारले. दैनंदिन जीवनात घडू शकणाऱ्या प्रसंगांची उदाहरणे देत विद्यार्थ्यांनी नागरिकांच्या शंकांचे निरसन केले. त्यामुळे सायबर सुरक्षेविषयीची माहिती केवळ व्याख्यानापुरती मर्यादित न राहता प्रत्यक्ष जीवनाशी जोडली गेली.




सायबर सुरक्षेबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा संवादात्मक उपक्रमांची आवश्यकता असून, डिजिटल व्यवहार वाढत असताना प्रत्येकाने सायबर सुरक्षेचे मूलभूत नियम समजून घेणे गरजेचे आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## दिल्लीच्या सत्य निकेतनमध्ये मोठी दुर्घटना! पाच मजली इमारत कोसळली, ५० विद्यार्थी ढिगाऱ्याखाली

नवी दिल्ली, वृत्त संध्या

**नवी दिल्ली:** दक्षिण दिल्लीतील सत्य निकेतन परिसरात पाच मजली इमारत अचानक कोसळल्याची धक्कादायक घटना घडली. या दुर्घटनेत इमारतीत पीजीमध्ये राहणारे सुमारे ५० विद्यार्थी ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. घटनेची माहिती मिळताच दिल्ली पोलिस, अग्निशमन दल आणि बचाव पथकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले.

सत्य निकेतन येथील शिव मंदिराजवळ ही इमारत जमीनदोस्त झाली. अग्निशमन विभागाला माहिती मिळाल्यानंतर १२ अग्निशमन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. मलबा हटवून अडकलेल्या नागरिकांचा शोध घेण्यात आला. बचाव पथकांनी काही जणांना ढिगाऱ्यातून बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.

इमारतीत विविध ठिकाणांहून आलेले विद्यार्थी पीजीमध्ये राहत होते. नेमके किती जण इमारतीत होते, याबाबत सुरुवातीला स्पष्टता नव्हती. काही विद्यार्थी ढिगाऱ्याखालून फोन करत असल्याची माहितीही समोर आली होती.

दरम्यान, आरके पुरमचे आमदार अनिल शर्मा यांनी घटनास्थळी पाहणी केली. एनडीआरएफ, एमसीडी, दिल्ली अग्निशमन दल, पोलिस आणि इतर यंत्रणांच्या मदतीने बचावकार्य राबविण्यात आले. खबरदारीचा उपाय म्हणून शेजारील इमारतही रिकामी करण्यात आली. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त करत बचावकार्याला वेग देण्याचे निर्देश दिले.



# आईशी संबंधाच्या संशयातून युवकाचा खून; मुलाने मित्राच्या मदतीने आखला कट

कऱ्हाड, प्रतिनिधी

कऱ्हाड : आईशी अनैतिक संबंध असल्याच्या संशयातून मुलाने मित्राच्या मदतीने युवकाचा निर्घृण खून केल्याची घटना कऱ्हाडातील मलाकापूर परिसरात घडली.

सुनिल नाथा चव्हाण (रा. चाफळ, ता. पाटण) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे. या प्रकरणी सूरज दीपक चव्हाण (रा. चाफळ) आणि त्याचा मित्र अक्षय सुरेश म्हेत्रे (रा. कोरेगाव, ता. सातारा) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुनिल चव्हाण याचे सूरजच्या आईसोबत गेल्या दोन वर्षांपासून संबंध असल्याचा संशय होता. दोघेही चाफळ येथे शेजारी राहत होते. या संबंधाची माहिती कुटुंबीयांना समजल्यानंतर संबंधित महिलेला दुसऱ्या गावी ठेवण्यात आले होते. मात्र, सुनिलशी तिचा संपर्क सुरू असल्याने सूरजच्या मनात राग होता. त्यातून त्याने मित्र अक्षयच्या मदतीने सुनिलचा खून करण्याचा कट रचल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.

सुनिल कऱ्हाडातील पिझ्झा हटमध्ये कामाला होता. रविवारी रात्री सूरज आणि अक्षय त्याच्या कामाच्या ठिकाणी त्याची वाट पाहत होते. रात्री एकच्या सुमारास कामावरून बाहेर पडलेल्या सुनिलला लाहोटीनगर येथील सर्व्हिस रस्त्यावर अडवून दोघांनी त्याच्या डोक्यात व शरीरावर कोयत्याने वार केले. या हल्ल्यात सुनिलचा जागीच मृत्यू झाला.

घटनेनंतर दोन्ही संशयित चारचाकी वाहनातून साताऱ्याच्या दिशेने पसार झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिस उपअधीक्षक राजश्री पाटील, पोलीस



निरीक्षक दत्तात्रय दराडे आणि डीबी पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवली. पोलिसांनी सातारा येथून सूरज व अक्षय यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेला कोयता आणि चारचाकी वाहन जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## वाई डाक उपविभागाची दमदार कामगिरी; PLI-RPLI महालॉगिन डेमध्ये १.५८ कोटींचा विमाहप्ता

सातारा प्रतिनिधी

**वाई:** वाई डाक उपविभागाने १९ ऑगस्ट रोजी झालेल्या PLI-RPLI महालॉगिन डेमध्ये तब्बल १ कोटी ५८ लाख रुपयांचा विमाहप्ता जमा करून उल्लेखनीय कामगिरी केली. या कामगिरीबद्दल महाराष्ट्र व गोवा डाक परिमंडळाचे मुख्य पोस्टमास्तर जनरल रामचंद्र जायभाये यांनी वाई डाक उपविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

वाई येथील किसनवीर महाविद्यालयाच्या सभागृहात ३० ऑगस्ट रोजी वाई डाक उपविभागाच्या वतीने 'ग्रामीण डाक सेवक संवाद व गौरव समारंभ' आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून रामचंद्र जायभाये बोलत होते. अध्यक्षस्थानी सातारा डाक विभागाचे प्रवर डाक अधीक्षक प्रसून्ना रेड्डी होते. किसनवीर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे, डाक उपअधीक्षक मयूरेश कोळे, सहाय्यक डाक अधीक्षक हितेश पाठक, सातारा (प.) डाक उपविभागाचे निरीक्षक धनेश यादव आणि वाई डाक उपविभागाचे निरीक्षक ज्ञानेश्वर डोंगरे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व स्वागतगीताने झाली. यावेळी १९ ऑगस्ट रोजी झालेल्या PLI-RPLI महालॉगिन डे तसेच आर्थिक वर्षात विविध उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ग्रामीण डाक सेवक, सब पोस्टमास्तर आणि डाक कर्मचाऱ्यांचा ट्रॉफी व पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.महालॉगिन डेमध्ये १ कोटी ५८ लाख रुपयांचा विमाहप्ता जमा केल्याबद्दल वाईचे डाक निरीक्षक ज्ञानेश्वर डोंगरे आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे विशेष कौतुक करण्यात आले.

वाई डाक उपविभागाने विविध उपक्रमांत सातत्याने केलेली कामगिरी डाक विभागासाठी अभिमानास्पद असल्याचे रामचंद्र जायभाये यांनी सांगितले.

भविष्यातही वाई डाक उपविभागाची टीम अशीच उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भारतीय डाक विभागामार्फत अत्यंत कमी खर्चात डाक जीवन विमा (PLI) आणि ग्रामीण डाक जीवन विमा (RPLI) योजना उपलब्ध करून दिल्या जातात. वाई व परिसरातील नागरिकांनी या योजनांचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहनही जायभाये यांनी केले.

डाक उपअधीक्षक मयूरेश कोळे यांनी वाई डाक उपविभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामगिरीचे कौतुक केले. पारितोषिक विजेत्या काही कर्मचाऱ्यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास वाई डाक उपविभागातील ग्रामीण डाक सेवक, सब पोस्टमास्तर तसेच डाक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.



## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची जाहिरात करता, उद्योगपतींच्या कर्जमाफीची का नाही?; नाना पटोलेंचा सरकारला सवाल

भंडारा प्रतिनिधी

**भंडारा:** लाडकी बहीण योजना, शेतकरी कर्जमाफी आणि उद्योगपतींच्या कर्जमाफीच्या मुद्द्यावरून काँग्रेस नेते नाना पटोले यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. सरकार एका बाजूला लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना दरमहा दीड हजार रुपये देत असल्याची जाहिरात करते; मात्र दुसरीकडे महिलांच्या इतर महत्त्वाच्या योजना बंद करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

लाखांदूर तालुक्यातील चारभट्टी येथे श्रावण मास समाप्तीनिमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमात पटोले बोलत होते. 'लाडकी बहीण' योजनेवरून सरकारवर निशाणा साधताना ते म्हणाले, ''हे सरकार बहिणींचे सख्खे भाऊ नसून बेईमान भाऊ आहेत. एका हाताने दीड हजार रुपये देण्याचे नाटक केले जात आहे, तर दुसऱ्या हाताने महिलांच्या योजनांवर गदा आणली जात आहे.''

सरकार 'लाडकी बहीण' योजनेसाठी १७ हजार कोटी रुपये आणि शेतकरी कर्जमाफीसाठी १३ हजार कोटी रुपये दिल्याची जाहिरात टीव्ही आणि वृत्तपत्रांमधून करते. मात्र, दहा बड्या उद्योगपतींचे तब्बल साडेतीन लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्यात आल्याचा दावा करत, ''या कर्जमाफीची जाहिरात सरकारने कधी केली का?'' असा सवाल पटोले यांनी उपस्थित केला.

उद्योगपतींच्या कर्जमाफीऐवजी ही रक्कम राज्यातील शेतकऱ्यांसाठी वापरली असती, तर पुढील दहा ते बारा वर्षे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा सातबारा कोरा राहिला असता, असेही पटोले यांनी सांगितले. त्यांच्या या आरोपांवर महायुती सरकारकडून काय प्रत्युत्तर दिले जाते, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



## ९९ रुपये द्या, ९९९९ रुपये मिळवा! फेसबुकवरचं आमिष पडलं महागात; ७३ हजारांची फसवणूक, राजस्थानातून २ आरोपी जेरबंद

सुधाकर नाडर, प्रतिनिधी

फेसबुकवरील बनावट पेजच्या माध्यमातून गुंतवणुकीवर मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत ऑनलाइन फसवणूक करणाऱ्या टोळीतील दोन मुख्य आरोपींना ओशिवरा पोलिसांच्या सायबर पथकाने राजस्थानमधून अटक केली आहे. या आरोपींनी मुंबईतील एका महिलेला ९९ रुपयांत ९९९९ रुपये मिळतील, असे भासवून तब्बल ७३ हजार ५२१ रुपयांची फसवणूक केल्याचे तपासात उघड झाले आहे.

ओशिवरा परिसरात राहणाऱ्या एका महिलेला जुलै महिन्यात फेसबुकवर 'Wizard Traders 7' नावाचे पेज दिसले. या पेजवर अल्प रक्कम भरून मोठा परतावा मिळण्याचे आमिष दाखविण्यात आले होते. संबंधित पोस्टवर क्लिक केल्यानंतर महिलेचा व्हॉट्सॲपद्वारे संपर्क साधण्यात आला. सुरुवातीला ९९ रुपये भरण्यास सांगितल्यानंतर विविध कारणे देत आरोपींनी महिलेकडून वेगवेगळ्या खात्यांमध्ये एकूण २२ व्यवहार करून घेतले. यात तिची ७३ हजार ५२१ रुपयांची फसवणूक झाली.

महिलेच्या तक्रारीवरून ओशिवरा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान सायबर पथकाने फेसबुक खाते आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपींचा माग काढला. आरोपी सतत ठिकाणे बदलत असल्याने पोलिसांनी राजस्थानातील जयपूर व दौसा जिल्ह्यात चार दिवस पाठलाग करून सापळा रचला. स्थानिक पोलिसांच्या मदतीने दीपक सिताराम मीना (वय २१) आणि हरकेश गोपाल मीना (वय ३०) यांना अटक करण्यात आली. आरोपींकडून दोन आयफोन, एक ओपो मोबाईल, ११ सिमकार्ड, एक डेबिट कार्ड आणि ऑनलाइन व्यवहारासाठी वापरला जाणारा क्यूआर स्कॅनर जप्त करण्यात आला आहे. आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना ७ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

ही कारवाई अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रादेशिक विभाग), पोलीस उपआयुक्त पुरुषोत्तम कराड, सहाय्यक पोलीस आयुक्त विनायक चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पोलीस निरीक्षक प्रभात मानकर, पोलीस निरीक्षक सचिन पाटील तसेच ओशिवरा पोलीस ठाण्याच्या सायबर पथकाने केली.




## ७० वर्षांच्या मंदाबाईंचे हात-पाय बांधले, तोंडाला लुगडे आवळले; शेततळ्यात फेकून निर्घृण हत्या

नाशिक प्रतिनिधी

वणी, दि. ६ : दिंडोरी तालुक्यातील लखमापूर येथे ७० वर्षीय वृद्ध महिलेची हात-पाय बांधून व तोंडाला लुगडे आवळून शेततळ्यात फेकून हत्या केल्याची धक्कादायक घटना शनिवारी (दि. ५) उघडकीस आली. मंदाकिनी हरिभाऊ सोनवणे (वय ७०, रा. लखमापूर, ता. दिंडोरी) असे मृत महिलेचे नाव आहे. या घटनेने लखमापूर परिसरात खळबळ उडाली असून, हत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

लखमापूर शिवारात मंदाकिनी सोनवणे यांचे घर असून, घराच्या मागील बाजूस सुमारे दोनशे फूट अंतरावर असलेल्या शेततळ्यात त्यांचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला. मृतदेहाची पाहणी केली असता त्यांचे हात व पाय दोरीने बांधलेले, तसेच तोंडाला त्यांच्याच लुगड्याने बांधल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे हा अपघाती प्रकार नसून हत्या करून मृतदेह शेततळ्यात फेकण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी नितीन राजाराम सोनवणे (वय ४५, व्यवसाय नोकरी, रा. लखमापूर, सध्या रा. चांदशी, ता. नाशिक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वणी पोलिस ठाण्यात रविवारी (दि. ६) अज्ञात आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेची माहिती मिळताच वणी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला.

मंदाकिनी सोनवणे या अत्यंत शांत, कष्टाळू व दानशूर स्वभावाच्या होत्या. मातीच्या वस्तू तयार करून त्या उदरनिर्वाह करत होत्या. अखंड हरिनाम सप्ताहात त्यांनी नारळ उचलून सन २०२६ मध्ये महाप्रसाद देण्याचा संकल्प केला होता. त्यानुसार त्यांनी महाप्रसादासाठी तयारीही सुरू केली होती. आपल्या हातून अन्नदानाचे मोठे कार्य व्हावे, अशी त्यांची इच्छा होती. अशा परिस्थितीत त्यांचा झालेला दुर्दैवी अंत ग्रामस्थांच्या मनाला चटका लावणारा ठरला आहे.

या हत्येमागील नेमके कारण काय, आरोपी कोण आणि या घटनेत आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. मृत महिलेच्या मागील काही दिवसांतील हालचाली, संपर्कातील व्यक्ती तसेच इतर बाबींची माहिती घेतली जात आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी ब्रह्मदेव शेळके व सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत फड यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असून, वणी पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक एन. एस. सोनवणे पुढील तपास करीत आहेत.

दरम्यान, मंदाकिनी सोनवणे यांच्या हत्येची सखोल चौकशी करून या घटनेमागील सत्य समोर आणावे आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी लखमापूर ग्रामस्थांनी पोलिसांकडे केली आहे. वृद्ध महिलेच्या हत्येचा उलगडा करून त्यांना न्याय मिळवून देण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.





हे मराठी साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक एकनाथ दगडू गाडे यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाळा नं.4, तळ मजला, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, आरे रोडच्या समोर, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं.2, गोरेगांव (पू), मुंबई-400063 येथे छापून आर-13, गौतम समता सेवा संघ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-51 येथून प्रकाशित केले.. संपादक एकनाथ दगडू गाडे (मो. 98213 49985) (RNI : MAHMAR/2013/50698)